भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१)
२०१३-१४ मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देण्याबाबत.
Article २७५ (१) of the constitution of India
to accord sanction to Write up of schemes

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१३/प्र.क्र.६९/का-१९

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक- ३०/०८/२०१४

वाचा:-

१) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्रमांक केंद्रिय-२०१३/प्र.क्र.६९/का-१९, दिनांक २२/०५/२०१४

२) आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांचे पत्र क्र.भासंअनु-२०१३/प्र.क्र.१५/का८(५) दि.०३/०७/२०१४

**प्रस्तावना:-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) या कार्यक्रमाखाली सन २०१३-१४ करिता मंजूर एकूण रु.१२४८९.०० लक्ष निधी योजना निहाय खर्च करण्यास आयुक्त,आदिवासी विकास यांना वितरीत करण्यात आलेला आहे. वाचा येथील निर्णयाद्वारे काही योजनांच्या मार्गदर्शक सूचना मंजूर करण्यात आलेल्या आहेत. आता खालील **नाविण्यपूर्ण योजनेच्या** मार्गदर्शक सूचना मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**-

खालील **नाविण्यपूर्ण योजनेच्या** /कामाच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार मंजूर करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. मंजूरी देण्यात आलेल्या सदर मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व योजना पूर्ण झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | मंजूर योजना | मंजूर निधी (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | पर्यावरण संपुरक खेडी विकास कार्यक्रम (Climate Smart Village Programme) | २००.०० |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९०११३१६३८८०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manojkumar Gorakh Mahale

Digitally signed by Manojkumar Gorakh Mahale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manojkumar Gorakh Mahale
Date: 2014.09.01 13:14:53 +05'30'

सहपत्र-परिशिष्ठ

(मनोजकुमार महाले)

कार्यासन अधिकारी

प्रत,

१. खाजगी सचिव, मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

२. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.

४. अतिरीक्त मुख्य सचिव कृषी, कृषी व पदूम विभाग,मंत्रालय,मुंबई

५. प्रधान सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.

६. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

८. आयुक्त कृषी,कृषी विभाग,पुणे.

९. Pramod Kumar Aggarwal,Regional Programme Leader , CGIAR Research program on Climate Change,CG Block B,२nd Floor NASC complex,Dev Prakash Shastri Marg,Pusa,New Delhi.११००१२

१०. सह सचिव (आस्थापना), आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई.

११. संगणक समन्वयक, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१३/प्र.क्र.६९ /का-१९ दि. ३०/०८/२०१४ चे परिशिष्ट

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नांव</td><td>पर्यावरण संपुरक खेडी विकास कार्यक्रम (Climate Smart Village Programme)</td></tr>
<tr><td>२</td><td>लाभार्थी क्षेत्र.</td><td>ठाणे ,पुणे व नागपूर जिल्हयातील निवडक गावे</td></tr>
<tr><td>३</td><td>अंमलबजावणी अधिकारी</td><td>International Maize and Wheat Improvement Centre ,India on Behalf of CGIAR Research Programme on Climate Change, Agriculture and Food Security ,South Asia,New Delhi ही संस्था</td></tr>
<tr><td>४</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>आयुक्त,आदिवासी विकास</td></tr>
<tr><td>५</td><td>योजनेचा उद्देश व हेतू</td><td>आदिवासी क्षेत्रातील शेत जमिनी या डोंगराळ प्रदेशातील असून तीव्र उतारावरील आहेत.तसेच या क्षेत्रातील कृषी पर्जन्याधारित असून हवामानाच्या अत्यंतीक विषमतेचा शेती उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत असतो.याक्षेत्रात शेतीच्या उत्पन्नात स्थैर्य येण्यासाठी गाव/खेडेनिहाय तपासणी करून जागतीक स्तरावर उपलब्ध असलेले ज्ञानाचा स्थानिक परिस्थितीनुरूप तंत्रज्ञान वापर होणे आवश्यक आहे. पर्यावरण संपुरक खेडी कार्यक्रमात आदिवासी क्षेत्रातील १००० आदिवासी खेडयांचा शेती उत्पादनात शाश्वत वाढ करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.यात जमीन, जमिनीतील कर्ब व अन्यद्रव्य , पाणी ,यांचे व्यवस्थापन,ज्ञान व्यवस्थापन,स्थानिक हवामानाधारीत उपाययोजना,युवक व महिलांचे सक्षमिकरण याव्दारे कृषि उत्पादनात विविधता आणून शेतकऱ्यांच्या उत्पनात स्थैर्य आणण्याचे नियोजन आहे.</td></tr>
<tr><td>६</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>International Maize and Wheat Improvement Centre ,India on Behalf of CGIAR Research Programme on Climate Change, Agriculture and Food Security ,South Asia व आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक</td></tr>
<tr><td>७</td><td>योजना राबविण्याच्या कार्यपध्दती</td><td>१.प्रस्तुत योजना ही ३ वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीचा वर्षनिहाय/कार्यक्रमनिहाय ढोबळ आराखडा सोबत जोडला आहे. यानुसार ठाणे ,पुणे व नागपूर जिल्हयात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून वर्षनिहाय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.(सविस्तर तपशील सोबत जोडला आहे.)
<table>
<tr><td>वर्ष</td><td>रक्कम( रु.लक्ष)</td></tr>
<tr><td>पहिले वर्ष</td><td>५००.५०</td></tr>
<tr><td>दुसरे वर्ष</td><td>१२२१.००</td></tr>
<tr><td>तिसरे वर्ष</td><td>११६६.००</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>२८८७.५०</td></tr>
</table>
२.उपरोक्त निधी प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांच्याकडून International Maize and Wheat Improvement Centre ,India on Behalf of CGIAR Research Programme on Climate Change, Agriculture and Food Security ,South Asia या संस्थेस उपरोक्तप्रमाणे वर्षनिहाय अदा करण्यात येईल. प्रकल्प अधिकारी यांनी संबधित संस्थेसोबत प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक तो करारनामा करण्यात यावा.तसेच याकामी नियुक्त केलेल्या राज्य स्तरीय समितीने योजनेच्या अंमलबजावणी संबधी सविस्तर आराखडयास मान्यता दिल्यानंतरच निधी वितरीत केला जाइल याची दक्षता आयुक्त,आदिवासी विकास यांनी घ्यावी . संबंधित संस्थेने निधीच्या विनियोगाबाबतचे गतवर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर पुढील वर्षाकरीता निधी वितरीत करण्यात यावा. संबंधित संस्थेने नियोजनाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी होण्याबाबत दक्षता घ्यावी. |
| ८ | योजनेच्या अटी व शर्ती | १. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी खेडी निवडतांना ते आदिवासी उपयोजना क्षेत्रातील / माडा/मिनी माडा /क्लस्टर क्षेत्रातीलच असावे.<br>2.या योजनेखाली केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना लाभ अनुज्ञेय राहील. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची शेतजमीनी त्यांचे नावे असावी व तसा ७/१२ उतारा व ८अ उतारा लाभार्थ्याजवळ असावा. लाभार्थ्यांची निवड प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सहकार्याने करण्यात यावी.<br>४.सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीबाबत आयुक्त,आदिवासी विकास, यांना International Maize and Wheat Improvement Centre ,India on Behalf of CGIAR Research Programme on Climate Change, Agriculture and Food Security ,South Asia **या संस्थेकडून** त्रैमासिक माहिती सादर करण्यात येईल.<br>५ योजनेची अंमलबजावणी करणा-या यंत्रणेने चांगल्या प्रतीची चित्रफीत (सिडी) व छायाचित्रे काढून खर्च अहवालासोबत **आयुक्त,आदिवासी विकास** यांना सादर करावी.<br>६. प्रकल्पाची छायाचित्रांसह यशोगाथा तयार करुन देणेची कामे संबंधीत प्रकल्प अधिकारी यानी करावी. तसेच योजने विषयी सर्व माहिती उदा. लाभार्थी यादी, फोटो, यशोगाथा इत्यादी अनुषंगीक माहिती आदिवासी विकास विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.<br>७. योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल करण्याचे अधिकार **शासनास** राहतील. |
| | संनियंत्रण | या योजनेच्या अंमलबजावणीस मार्गदर्शन ,सहाय्य व गती देण्यासाठी खालील प्रमाणे राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात यावी.<br>1.अध्यक्ष-प्रधान सचिव,आदिवासी विकास ,मंत्रालय,मुंबई<br>2.सदस्य- सह सचिव,नॅशनल मिशन फॉर सस्टनेबल ॲग्रीकल्चर ,कृषि मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली<br>3.सदस्य- International Maize and Wheat Improvement Centre ,India on Behalf of CGIAR Research Programme on Climate Change, Agriculture and Food Security ,South Asia यांचा प्रतिनिधी.<br>4.सदस्य-आयुक्त कृषी,कृषी विभाग,महाराष्ट्र<br>5.सदस्य सचिव-आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक.<br>सदर समिती या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर आराखडा तयार करून त्यास मंजूरी देईल. अंमलबजावणी संबधित यंत्रणेकडून करून घेणे व अंमलबजावणीतील अडचणीवर उपाययोजना करण्याची कामे समितीकडून करण्यात येइल. |